# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल :dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/ १८००

दिनांक : ०७/०५/२०१५

## परिपत्रक क्र.७९/२०१५

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, कलम ८२ मधील तरतुदीनुसार तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, शैक्षणिक वर्ष २०१५—१६ साठी नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव तसेच संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांकडून तुकडीवाढ, विषयवाढ, विद्याशाखा विस्तार याबाबतचे प्रस्ताव मागविण्यात आले होते व ज्या प्रस्तावांची शिफारस करण्यात आली होती असे सर्व प्रस्ताव मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालयात दि. २८ एप्रिल, २०१५ रोजी हस्तपोहोच करण्यात आले होते. तथापि, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या क्र. उशिप १११३/प्र.४०५/विशि—३, दि. २९ एप्रिल, २०१५च्या पत्रानुसार विद्यापीठास खालील निर्णय कळविण्यात आलेला आहे.

''शैक्षणिक वर्ष २०१५—१६ साठी नवीन महाविद्यालय (पारंपरिक, व्यावसायिक) विद्याशाखा, विषय / अभ्यासक्रम, वाढीव तुकडयांच्या प्रस्तावांना मान्यता न देण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला आहे. सदरचा निर्णय सर्व संस्था / महाविद्यालयांना विद्यापीठ स्तरावरून कळविण्यात यावा''.

सदर शासन निर्णयाच्या पत्राची प्रत सर्व संबंधितांना माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

संचालक
(म.वि.वि.मं.)

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषदेपुढे अकृषी विद्यापीठांचे बृहत आराखडे मान्यतेसाठी ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र. उशिप १११३/प्र.४०५/विशि-३
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २९ एप्रिल, २०१५.

परिपत्रक :-

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८२(१) मध्ये बृहत आराखडा करण्यासंबंधी जी तरतूद आहे, त्या तरतुदीची व्यापकता विचारात घेऊन सखोल अभ्यासांती बृहत आराखडा तयार होऊन तो शासनास सादर होऊन शासनामार्फत राज्य उच्च शिक्षण परिषदेस सादर होऊन त्यास परिषदेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८२(३) मधील तरतुदीनुसार नविन महाविद्यालय (पारंपारिक, व्यावसायिक) विद्याशाखा, विषय / अभ्यासक्रम, वाढीव तुकडया मागणी करणारे प्रस्ताव संबंधित संस्थांनी दि.३१ ऑक्टोबरपुर्वी विद्यापीठाकडे सादर करणे अनिवार्य आहे. त्यासाठी संबंधित विद्यापीठाने तयार केलेल्या बृहत आराखडयामध्ये विहित केलेली स्थाने विचारात घेऊन सर्व विद्यापीठांच्या जाहिरात प्रसिद्ध करण्यात येतात. विद्यापीठाच्या बृहत आराखडयानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विद्यापीठ अधिनियम व शासन निर्णय ३०.१०.२०१० नुसार विहित कार्यपध्दती आणि शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या निकषांच्या आधारे विद्यापीठ व शासनस्तरावर तपासणी करुन पात्र ठरलेल्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येते.

२. उच्च शिक्षण हे ग्रामीण, डोंगराळ, आदिवासी, नक्षलग्रस्त इत्यादी भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावे या हेतूने संपूर्ण राज्यामध्ये महाविद्यालयाचे अभ्यासपुर्ण व समतोल जाळे निर्माण होणे अपेक्षित आहे. तथापि,मागील वर्षी जवळपास २५ टक्के जागा रिक्त होत्या. तसेच चालू वर्षी मान्यता देण्यातं आलेल्या नविन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम व वाढीव तुकडया या माध्यमातून वाढीव प्रवेश क्षमता निर्माण झाली आहे. यास्तव,राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी नविन महाविद्यालय(पारंपारिक, व्यावसायिक) विद्याशाखा, विषय / अभ्यासक्रम, वाढीव तुकडयांच्या प्रस्तावांना मान्यता न देण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला आहे. सदरचा निर्णय सर्व संस्था/ महाविद्यालयांना विद्यापीठ स्तरावरुन कळविण्यात यावा.

३. त्याचप्रमाणे वर नमुद केल्या नुसार अधिनियमातील तरतुदीनुसार विद्यापीठांनी तीन महिन्याच्या आत सुधारीत बृहत आराखडा तयार करुन, तो उच्च शिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करावा. सदर निर्देशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१५०४३०११५९०३१९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Paraji Malikarjun Takate

Digitally signed by Paraji Malikarjun Takate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Paraji Malikarjun Takate
Date: 2015.04.30 15:37:53 +05'30'

(पा.म.ताकटे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. कुलपतींचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
४ कुलसचिव सर्व अकृषी विद्यापीठे
५. विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११.निवडनस्ती (विशी-३)